# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय

(कला व वाणिज्य)

(अचलपूर कॅम्प) परतवाडा जि. अमरावती (महाराष्ट्र)

## योगशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल - 2020-21

योग मानवतेची प्राचीन संपत्ती आहे. मानवाव्दारे संग्रहीत सर्वात अमुल्य खजिना आहे. योगाव्दारे मनुष्याला शारीरिक, मानसिक, सामाजिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक आरोग्य प्राप्त करता येते. म्हणूनच वर्तमान शिक्षणामधून विद्यार्थ्यांना योगशिक्षण प्रदान करणे आवश्यक आहे. सत्र 2020-21 मध्ये कोविड-19 चा प्रादुर्भाव तसेच शासन आदेशानुसार लॉकडाऊन ची बंधने पाळत Work Form Home यानुसार योगशास्त्र विभागाचे कामकाज Whatsapp, Group Call, Personal Call, Google Form या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. या सत्रातील कार्यांचे व उपलब्ध्यांचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

- स्व. छगनलाल मगनलाल कढी कला महाविद्यालय, अचलपूर कॅम्प, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, चिखलदरा आणि बी. एस. पाटील महाविद्यालय, परतवाडा च्या शारीरिक शिक्षण विभागाव्दारे 21 जून 2020 ला 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. उमेकर, प्रमुख अतिथी रविंद्र सावरकर, या कार्यक्रमाचे संचालन प्रा. एस. भागवत (शारीरिक शिक्षण विभागप्रमुख) आणि योग प्रात्याक्षिक सत्र प्रा. प्रशांत गावंडे तसेच आभार प्रदर्शन प्रा. एन. बुराडे (योगविभाग प्रमुख) यांनी केले. या कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी सहभागी झाले होते.
- या सत्रात बी.ए भाग-1/2/3 आणि एम.ए भाग—1/2 ला प्रवेशित विद्यार्थ्यांचा Whatsapp Group तयार करून अभ्याक्रमाशी संबंधित syllabus, Notes उपलब्ध करून देण्यात आल्या.
- या सत्रात Group Call, Personal Call करून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी संबंधित माहिती देण्यात आली. तसेच त्यांना आलेल्या अडचणीचे निराकरण करण्यात आले.
- या सत्रातील बी.ए भाग-1/2/3 आणि एम.ए भाग—1/2 या वर्गाच्या Theory, Practical, Internal Assessment (Unit Test, Viva-Voce) या सर्व परीक्षा MCQ प्रकारे ऑनलाईन पद्धतीने असल्यामुळे 1200 MCQ योग प्रश्नसंच तयार करून विद्यार्थ्यांना देण्यात आला. या योग प्रश्न संचामध्ये सर्व वर्गांच्या अभ्यासक्रमावर आधारित प्रश्न तयार करण्यात आले होते.
- या सत्रात Internal Assessment च्या अंतर्गत Unit Test, Viva-Voce हे Google Form वर MCQ च्या माध्यमातून घेण्यात आले. तसेच Assignment चे Submission Pdf च्या माध्यमातून Whatsapp Group वर करून घेण्यात आले.
- या सत्रात U.G, P.G च्या Practical Exam विद्यापीठाच्या निर्देशानुसार या Google Form वर 25 MCQ तयार करून घेण्यात आल्या.

Scanned with CamScanner

- 'योग आणि ध्यान' या योजनेनुसार 01 ऑगस्ट 2020 ते १४ ऑगस्ट 2020 पर्यंत महाविद्यालयातील इतर शाखा/विभागातील अंतिम वर्गातील विद्यार्थ्यांसाठी आरोग्याच्या दृष्टिकोनातून योग प्रात्यक्षिक वर्गाचे आयोजन करण्यात आले. या वर्गांचा कालावधी दोन आठवडे असून हे प्रात्याक्षिक वर्ग प्रा. एन. ए. बुराडे यांनी घेतले.
- योगशास्त्र विभागातील विद्यार्थी सं. गा. बा. अमरावती विद्यापीठ अंतर्गत उन्हाळी – 2020 परीक्षेत विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये कु. चारुशीला गुजर - प्रथम मेरीट (एम.ए योगशास्त्र) कु. अंजु वाटाणे - व्दितीय मेरीट (एम.ए योगशास्त्र) आले आहेत.

(प्रा. एन. ए. बुराडे)
योगशास्त्र विभाग प्रमुख
बी. एस. पाटील. महाविद्यालय, परतवाडा

Scanned with CamScanner